**त्रयस्त अर्जदार/हरकतदारतर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**उलट तपास दरखास्तदारतर्फे विधिज्ञ श्री.ए.ए.मोंडकर यांचेमार्फत शपथेवर सरू**

१२. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला संतोष दांडकर हा माझा सख्खा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याची रिक्षा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांच्या रिक्षातून कोर्टात येतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कोर्टात आल्यानंतर एकत्र जेवायला जातो. हे म्हणणे खरे आहे की, मी संतोष दांडकर व उल्हास दांडकर याला भाऊबिज रक्षाबंधन दिवशी ओवाळणी करतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वार्षिक सण एकत्र साजरे करतो.

१३. हे म्हणणे खरे आहे की, उल्हास उर्फ विलास दांडकरचे वकील हे श्री. एम.बी.सुकाळी साहेब आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. २१/१०/२०१५ रोजी सुकाळी वकील साहेब यांनी उल्हास उर्फ विलास दांडकर यांचे वकीलपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वकील देखील श्री.एम.बी.सुकाळी हे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, उल्हास दांडकर याचे वकील सुकाळी वकील साहेब असल्याने मला सदर प्रकरणाची माहिती वेळोवेळी प्राप्त होत राहते. हे म्हणणे खरे नाही की, मला संतोष पासून प्रस्तुत प्रकरणाची माहिती मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, उल्हासने कोरोना काळात या प्रकरणाचे काढलेल्या प्रकरणावरुन प्रस्तुत प्रकरणाची माहिती झाली. साक्षीदार पुन्हा सांगते की, मला कोर्टातून माहिती मिळाली. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी कोर्टातून कागदपत्रे प्राप्त केलेली आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी कोर्टातून भाडेकराराच्या पावत्या व भाडे करार कोर्टातून प्राप्त केले. मी कोर्टातून कागद प्राप्त करण्यासाठी अर्ज केला होता. मी तसा कागदपत्रे मिळणेसाठी दाखल केलेला अर्ज दाखल केलेला आहे. साक्षीदार कागदपत्रे पाहून सांगते की, मी तो अर्ज अभिलेखावर दाखल नाही. मी तो अर्ज अभिलेखावर दाखल करु शकते.

अर्ज दाखल करेपर्यंत उलट तपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

एम.के.फकीह

दि. २३/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.